इयत्ता – ६ वी अ,ब,क. FINAL EXAMINATION मार्क – ८०

दिनांक : ९ मार्च २०२६ विषय : मराठी वेळ – २ तास

**INSTRUCTIONS – 1. This paper comprises of two sections. Section A & B.**

**2. Section 'A' answers must be written on the answer Sheet.**

**3. Section 'B' answers must be written on worksheet Itself.**

---

**विभाग " अ "** **गुण ४०**

**प्रश्न १. खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:**

**मोठी आई**

आपली आई आपल्यावर किती माया करते. खाऊपिऊ घालते. पोटाशी घेते, गोष्टी सांगते. किती छान असते आपली आई!

या आईहून एक मोठी आई आहे. तीदेखील किती छान आहे! तिने तुम्हां - आम्हांला लागणारी प्रत्येक गोष्ट तयार केली आहे. कोणत्या ना कोणत्या स्वरूपात दिली आहे. हे जेवणाचे ताट पाहा. यातला प्रत्येक जिन्नस मोठी आई होती म्हणून मिळाला आहे. तुम्ही राहता ते घर, त्याला लागणारे लाकूड, दगडसुद्धा त्या आईने दिले. कोण बरे अशी ही मोठी आई? तिचे नाव भूमी! जमीन!

जमिनीत काय आहे? माती, हीच का ती आई? तुम्ही म्हणाल-खरेच ते. मातीच आहे जमिनीत; पण मातीला तुम्ही कमी समजू नका, माती आहे म्हणूनच आपण जिवंत आहोत.

जेवणाच्या ताटातला प्रत्येक जिन्नस मोठ्या आईने दिला, म्हणजेच तो जमिनीतून निर्माण झाला. गव्हाची पोळी, जोंधळ्याची भाकरी, तांदळाचा भात! गहू, तांदूळ व जोंधळे कोठे तयार होतात? शेतातच ना! पाटी-पेन्सिलीचे मऊ दगडही जमिनीतच सापडतात.

चहाची साखर घ्या. ती उसापासून करतात; पण ऊस उगवतो कोठे? जमिनीत. रॉकेल कुठे सापडते? जमिनीतल्या खाणीत, केळी, कवठे, पेरू, आंबे, नारळ, द्राक्षे, फणस इत्यादी तुम्हांला आवडणारी फळे जमिनीमुळे मिळतात. जमीन नसती तर यांतला एकही जिन्नस मिळाला नसता. साऱ्या भाज्या, जगातील सारी फुले, औषधांची सगळी झाडे जमिनीतूनच जीव धरून वाढतात. आहे ना आपली आई मोठी?

चांदी, रुपे, पितळ, ताबे या सगळयांच्या खाणी मोठ्या आईच्या पोटात सापडतात, पितळ, तांबे, कथील नसते, तर आपण भांडी कशाची केली असती? सोने, रुपे नसते तर दागिने कसे मिळाले असते ?

एवढेच नाही! अजून ऐका. या मोठ्या आईच्या पोटात लोखंड व दगडी कोळसा यांच्याही प्रचंड खाणी आहेत. लोखंड व कोळसा यांमुळे तर प्रत्येक गिरणी अन् प्रत्येक कारखाना चालतो. कारखाने नसते, तर लोखंडी खुर्च्या व पलंग मिळाले नसते. सुया, टाचण्या, चाकू, कात्र्या, गुंड्या, काचेचे सामान, मोटारी, आगगाड्या, विमाने इत्यादी सगळे सगळे बनलेच नसते.

**कृती १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा** **गुण ५**

१. मोठ्या आईच्या पोटात कोणत्या प्रचंड खाणी आहेत ?

२. कोण आहे म्हणून आपण जीवंत आहोत?

३. चहाची साखर कशापासून बनते?

४. जमिनीच्या खाणीत कोणकोणती आवडणारी फळे मिळतात ?

५. प्रत्येक गिरणी आणि प्रत्येक कारखाना कशामुळे चालतो?

**कृती २. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :** **गुण ३**

१. आपली आई आपल्यावर किती ------------------------- करते.

२. ------------------- आहे म्हणूनच आपण जिवंत आहोत.

३. हे जेवणाचे ताट पाहा. यातला प्रत्येक -------------------------- मोठी आई होती म्हणून मिळाला आहे.

४. ------------------------ नसती तर यांतला एकही जिन्नस मिळाला नसता.

५. ----------------------------- नसते, तर लोखंडी खुर्च्या व पलंग मिळाले नसते.

६. सोने, रुपे नसते तर ---------------------- कसे मिळाले असते ?

**कृती ३. समानार्थी शब्द लिहा :** **गुण २**

(कारखाना, वस्तु, जमीन, घासलेट)

१. जिन्नस २. भूमी ३. रॉकेल ४. गिरणी

**प्रश्न २. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा: ( कोणतेही ६ ) ANY 6** **गुण ६**

१. कलिंगचा राजा संतुष्ट का झाला ?

२. चुना कशापासून तयार करतात ?

३. विजा केव्हा चमकल्या ?

४. परीक्षा घेणाऱ्या राजाचे राज्य कोणते होते ?

५. भारतमातेने कोणती शिकवण दिली आहे ?

६. विजयनगरच्या राजाचे नाव काय होते ?

७. भारतमाता या कवितेच्या कवयित्री कोण आहेत?

८. उत्कृष्ट दर्जाची मूर्ती कोणती?

**प्रश्न ३. खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिहा: (कोणतेही ३) ANY 3** **गुण ९**

१. कलिंगच्या राजाने अप्पाजींची दुसऱ्यांदा कशी परीक्षा घेतली?


२. लेखिकेच्या मते , मातृभूमीबद्दल प्रेमभाव का बाळगावा ?

३. अप्पाजींच्या मते, उत्तम माणूस कोणता ?

४. कारखान्यात धातूपासून कोणकोणत्या वस्तू तयार होतात ?

**प्रश्न ४. खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा : (ANY 1)** **गुण ५**

१. चित्रावरून लेखन करा : PICTURE COMPOSITION



मुद्दे : वाहनाचे नाव - वाहनाचा उपयोग – इंधन नको – स्वस्त – व्यायाम – आरोग्य.

२. माझी आई : MY MOTHER

मुद्दे : आई ही एक परमेश्वरासमान – आईचे नाव – आईचा स्वभाव – आईचे शिक्षण
आईचे दररोजचे काम – आईचे वर्णन .

३. पावसाळ्यातील एक दिवस : A DAY IN THE RAINY SEASON

मुद्दे: भारतातील तीन मुख्य ऋतु - उन्हाळ्यात कडक ऊन – पावसात थंड वातावरण – आनंदी आनंद – सर्वत्र हिरवेगार वातावरण – पावसाळ्यात भिजायला आवडणे - खेळायला आवडणे – मजाच मजा .

**प्रश्न ५. खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

चंद्रसेना राजकन्या अगदी हट्टी होती. दररोज काही ना काही तिचा हट्ट असे. एक दिवस तिने न संपणारी गोष्ट सांगण्याचा हट्ट धरला. राजाने तिला खूप समजावले, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. शेवटी राजाने दवंडी पेटवली की राजकन्येला न संपणारी गोष्ट ऐकायची आहे. तिला जो कोणी अशी गोष्ट सांगेल त्यास अर्धे राज्य बक्षीस दिले जाईल. असे करण्यात कोणी अयशस्वी ठरल्यास त्याला मृत्यूदंड दिला जाईल.

दवंडी ऐकल्यावर अर्धे राज्य मिळणार या विचारांनी खूप लोकांनी प्रयत्न करायचे ठरवले पण मृत्यूदंडाच्या भयाने बरेच जण मागे फिरले. अनेक देशातील लोकांनी प्रयत्न केले पण सारे असफल झाले. राजकन्या मनोमन कष्टी झाली. एक दिवस दौलती नावाचा तरुण शेतकरी शेतात काम करत होता. शेतात धान्य तयार झाले होते. धान्य पोत्यात भरण्याचे काम सुरू होते. इतक्यात एक चिमणी आली व एक दाणा घेऊन उडून गेली तिला पाहून दौलतीच्या मनात एक विचार आला. की राजवाड्यात जाऊन राजकन्येला गोष्ट सांगावी.

तो राजवाड्यात राजकन्येला गोष्ट सांगण्यास आला. गोष्टीस सुरुवात झाली. दौलती सांगू लागला धान्याचे एक कोठार असते ते पाहून एक चिमणी आली दाणा घेऊन उडून गेली. एक चिमणी आली दाणा घेऊन उडून गेली. परत एक चिमणी आली दाणा घेऊन उडून गेली. दौलतीच्या गोष्टीतल्या चिमण्या संपतच नव्हत्या गोष्टही पुढे सरकत नव्हती. शेवटी राजकन्या कंटाळली तिला आपली चूक समजली. दौलतीला अर्धे राज्य बक्षीस म्हणून मिळाले.

**कृती १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा:** **गुण ६**

१. एक दिवस चंद्रसेनेने काय हट्ट केला?

२. राजाने काय दवंडी पिटवली?

३. बरेच लोक कोणत्या भयाने मागे फिरले?

४. काय पाहून दौलतीच्या मनात विचार आला?

५. राजकन्या का कंटाळती?

६. शेवटी दोलतीला काय मिळाले?

**कृती २. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :** **गुण ४**

१. ---------------------- ऐकल्यावर अर्धे राज्य मिळणार या विचारांनी खूप लोकांनी प्रयत्न करायचे ठरवले.

२. असे करण्यात कोणी अयशस्वी ठरल्यास त्याला ---------------------- दिला जाईल.

३. शेवटी ------------------------------ कंटाळली तिला आपली चूक समजली.

४. दौलती सांगू लागला ------------------ एक कोठार असते ते पाहून एक चिमणी आली दाणा घेऊन उडून गेली.

*** **BEST OF LUCK** ***

**GREEN LAWNS HIGH SCHOOL, WARDEN ROAD.**

इयत्ता – ६ वी अ,ब,क. FINAL EXAMINATION मार्क – ८०

दिनांक : ९ मार्च २०२६ विषय : मराठी वेळ – २ तास

**INSTRUCTIONS – 1. Section 'B' answers must be written on worksheet Itself.**

**Name : ---------------------------------------- Div : ------------------- Roll No : ---------------**

---

**विभाग " ब "** **गुण ४०**

**प्रश्न १.(अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :** **गुण ४**

( मागे, बलवान, मगे, बालवान, उदक, उदाक, भ्राम, भ्रम, अफाट, अफात, कौशल्य, सुंदर, सूंदर, धेनु, धेनू )

१. पाणी : ---------------------------------------- २. भास : ----------------------------------------

३. कसब : ---------------------------------------- ४. गाय : ----------------------------------------

५. सुबक : ---------------------------------------- ६. माघारी : ----------------------------------------

७. विस्तृत : ---------------------------------------- ८. समर्थ : ----------------------------------------

**प्रश्न १.(ब) खालील शब्दांचे विरुदारथी शब्द लिहा :** **गुण ४**

(अधोगती, अधोगति, राठ, रांठ, अस्वस्त, अस्वस्थ, महाग, सुरक्षित, सूरक्षित, बेपर्वा, बेपरवा, पराजय, मावळणे, मावलणे )

१. स्वस्थ X ---------------------------------------- २. विजय X ----------------------------------------

३. धोकादायक X ---------------------------------------- ४. उजाडणे X ----------------------------------------

५. स्वस्त X ---------------------------------------- ६. प्रगती X ----------------------------------------

७. पर्वा X ---------------------------------------- ८. नाजूक X ----------------------------------------

**प्रश्न १.(क) खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा :** **गुण ४**

( चुळती, चुलती, शिष्या, पुतणी, शिश्या, पुतनी, सावली, सावळी, पिता, विद्यार्थिनी, विद्यार्थीनी, नांगीन, नागीण, बैरागीन, बैरागीण )

१. पुतण्या : ---------------------------------------- २. नाग : ----------------------------------------

३. शिष्य : ---------------------------------------- ४. चुलता : ----------------------------------------

५. बैरागी : ---------------------------------------- ६. विद्यार्थी : ----------------------------------------

७. माता : ---------------------------------------- ८. सावळा : ----------------------------------------

**प्रश्न १.(ड) खालील शब्दांचे वचन बदलून लिहा :** **गुण ४**

१. ग्रंथ : ---------------------------- २. दुरुस्ती : ----------------------------

३. उदाहरण: ---------------------------- ४. पक्षी: ----------------------------

५. ताट : ---------------------------- ६. हिरा : ----------------------------

७. विचार : ---------------------------- ८. खांदा : ----------------------------

**प्रश्न २. (अ). खालील वाक्यातील नाम व प्रकार ओळखा :** **गुण २**

१. रिमाने आनंदाने उड्या मारल्या.

उत्तर: नाम : ---------------------------- प्रकार : ----------------------------

२. त्याला खूप दु:ख झाले.

उत्तर: नाम : ---------------------------- प्रकार : ----------------------------

**प्रश्न २.(ब) खालील वाक्यातील विशेषण व प्रकार ओळखा.** **गुण २**

१. सह्याद्रीसारखा अवघड डोंगर चढताना मला धाप लागली.

उत्तर: विशेषण : ---------------------------- प्रकार : ----------------------------

२. रुग्णाजवळ एकच व्यक्ती थांबेल.

उत्तर: विशेषण : ---------------------------- प्रकार : ----------------------------

**प्रश्न ३. ( अ) खालील विरामचिन्ह ओळखून त्यांच्या जोड्या जुळवा.** **गुण २**

| अ. क्र | "अ" गट | उत्तरे | "ब" |
|---|---|---|---|
| १. | ( ? ) | | अर्धविराम |
| २. | ( " " ) | | प्रश्नचिन्ह |
| ३. | ( ! ) | | अवतरण चिन्ह |
| ४. | ( ; ) | | उद्गारचिन्ह |

**प्रश्न ३. (ब) अचूक शब्द ओळखा :** **गुण २**

१. कापशी / कपाशी / कापाशी : ----------------------------

२. उशीर / उशिर / ऊशीर : ----------------------------

**प्रश्न ३. (क). खालील दिलेल्या शब्दापासून अर्थपूर्ण वाक्ये तयार करा.** **गुण २**

१. चतुर (clever) : ------------------------------------------------

२. भारतमाता (motherland): ------------------------------------------------

**प्रश्न ४.(अ). रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :** **गुण ३**

१. ------------------------ कृष्णदेवराय राज्य करत होते.

( रामनगरमध्ये , कलिंगमध्ये , विजयनगरमध्ये )

२. त्याने एक ------------------------ तार घेतली.

( कठीण , जड, लवचीक, लवचिक )

३. त्याने एकसारख्या दिसणाऱ्या ------------------------ मूर्ती मागवल्या.

( तीन , चार पाच )

**प्रश्न ४.(ब). खालील दिलेल्या शब्दांचे अर्थ लिहा :** **गुण ४**

( वाईट, विश्वास, सुवास, हुशारी, पांढराशुभ्र, आवडती, वेगवान, नमस्कार )

१. प्रियतम : ------------------------ २. चतुराई : : ------------------------

३. गंध: : ------------------------ ४. जलद : : ------------------------

५. धवल : ------------------------ ६. निकृष्ट : ------------------------

७. वंदन : ------------------------ ८. खात्री : ------------------------

**प्रश्न ४. (क). वाक्प्रचार व अर्थ लिहा :** **गुण ७**

**( शाबासकी देणे, कसोटी पाहणे, सांगावा धाडणे, प्रेम करणे, पडताळून पाहणे, जिवंत राहणे, नमस्कार करणे )**

१. परीक्षा घेणे : ------------------------

२. माया करणे : ------------------------

३. वंदन करणे : ------------------------

४. प्रयोग करणे : ------------------------

५. जीव धरणे : ------------------------

६. निरोप पाठवणे : ------------------------

७. अभिनंदन करणे : ------------------------

***** BEST OF LUCK *****